# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शंकर दत्तात्रय जोंधळेकर ,<br>मु. पो. पडळी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण २ विभागीय कार्यालय, कोल्हापूर<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, राधानगरी, जि. कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :–** १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शंकर दत्तात्रय जोंधळेकर , मु. पो. पडळी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर यांनी अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल अधिनियम २००६ मधील विनियम ६.१० नुसार मंचाकडे दि. ११.५.२०१० रोजी तक्रार दाखल केली.तक्रारदार हा अल्प भूधारक शेतकरी आहे. त्यांनी ५ एचपी वीज कनेक्शनसाठी वितरण कंपनीकडे दि. ८.१०.२००७ रोजी अर्ज केला व तो मंजूर करण्यात आला आहे. त्यासाठी तक्रारदाराने दि. १.२.२००४ रोजी रु. ५०००/– भरले आहेत व टेस्ट रिपोर्ट दि.२८.२.२००९ रोजी दाखल केला आहे.

श्री. दिनकर जोंधळेकर यांनी तक्रारदार यांस त्यांचे गट क्र. ३७७ मधील विहीरीवर ५ एचपीची मोटर बसविणेस संमत्ती दिली आहे व त्यांनी स्वत:ही वीज जोडणीची मागणी केली आहे. तक्रारदार व त्यांचे भाऊ श्री. दिनकर जोंधळेकर यांनी सर्व साहित्य व इलेक्ट्रीक मोटर खरेदी केली आहे. दि. १५.२.२००९ चे प्रसिध्दीकरणानुसार अर्जदार यांना ५ एचपीचा वीज पुरवठा मंजूर झाला आहे, परंतु अद्याप शेतीपंपासाठी वीज कनेक्शन देण्यात आले नाही. म्हणून त्यांनी प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे दिनांक ३.३.२०१० क्ष फॉर्ममध्ये तक्रार केली. अंतर्गत कक्षाने दि. २५.३.२०१० रोजी करुन सहाय्यक अभियंता, राधानगरी यांना तक्रारदाराचे वीज कनेक्शन एसपीए योजनेखाली मंजूर करुन द्यावे व मंजुरीनंतर त्वरित कनेक्शन द्यावे असे आदेश पारित केले. सदरच्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतचा अर्ज मंचासमोर दि. ११.५.२०१० रोजी दाखल केला आहे.

कक्षाने आपल्या दि. २५.५.२०१० च्या मंचाला अग्रेषित केलेल्या पत्रात वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे नमूद केले आहे की, सदर तक्रारदार यांचे वीज कनेक्शन एसपीए योजनेखाली मंजूर झाले होते. सदर अंदाजपत्रकाप्रमाणे नवीन विद्युत कनेक्शन मिक्स फिडरवर मंजूर आहे. परंतु मुख्य कार्यालयाच्या परिपत्रकाप्रमाणे नवीन शेतीचे कनेक्शन मिक्स फिडर किंवा गावठाण फिडरवर देता येत नाही. तसेच शेती फिडरवर सदर कनेक्शन द्यावयाचे असेल तर त्यासाठी ४ कि.मी. ११ केव्ही लाईन व १ रोहित्र करणे गरजेचे आहे. नवीन योजनेत सदरचे काम समाविष्ट केले आहे. त्यामुळे नवीन विद्युत कनेक्शन देता येत नाही.

प्रस्तुतच्या तक्रारीची सुनावणी दि. ९.६.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर. वि.प.तर्फे श्री. कांबळे, कनिष्ठ अभियंता उपस्थित. ॲडव्होकेट श्री. सोनाळकर हे मंचासमोर उपस्थित, त्यांचेशी चर्चा केली असतां, तक्रारदार हा पक्षाचा कार्यकर्ता आहे, जनता पक्षाच्या मी त्यांचे सोबत आलो आहे. त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार वकिलांना मंचासमोर केस चालविता येत नाही हे माहित आहे. तक्रार यांनी त्वरित कनेक्शन मिळावे अशी मागणी केली. या उलट, कनिष्ठ अभियंता श्री. कांबळे यांनी ३ महिन्यात जोडणी देण्याचे मान्य केले व सोबत मंचासमोर लेखी म्हणणे देत असल्याचे कबूल केले. त्याप्रमाणे लेखी अहवाल सादर केला.

अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार तक्रारदार यांचे शेती पंपाचे वीज कनेक्शन एस.पी.ए. योजनेखाली, एच.टी. लाईन ११ के.व्ही. ४.२ कि.मी., ट्रान्स्फॉर्मर ४ ६३ केव्हीए व ३ फेज ४ वायर एल.टी. लाईन १.४ कि.मी. मंजूर करणेत आलेले आहे. ( Revised estimate – SPA/RDN/HT.Lt & T/C for agrcultural 2 nos. Ag. connection at Dalviwadi/RDN/8 of 2010-11) . प्रस्तुतचे कामाबद्दल ठेकेदाराला काम देणेची प्रक्रिया (टेंडर प्रक्रिया) कंपनीच्या मंड कार्यालयामध्ये चालू आहे. ठेकेदाराला काम मिळताच सदरचे काम ताबडतोब हाती घेवून सदरचे तक्रारदाराचे कनेक्शन जेष्ठतेनुसार जोडणेत येत आहे.

यावरुन एक गोष्ट निश्चित, वितरण कंपनीला तक्रारदार यांस वीज जोडणी देण्यामध्ये कांही तांत्रिक अडचणी होत्या त्या दूर झाल्या आहेत, कामाच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरीपण मिळालेली आहे. टेंडरची प्रक्रिया पूर्ण होताच तक्रारदारास वीज जोडणी श्री. कांबळे यांनी मंचासमोर तोंडी सांगितल्याप्रमाणे ३ महिन्यांत देण्याचे मान्य केले आहे. लेखी अहवालात जेष्ठतेनुसार वीज जोडणी देण्यात येईल असे म्हटले आहे. वि.प.ने तांत्रिक बाबी व्यतिरिक्त कनेक्शन देण्याबाबत कांही अडचणी आल्याचे मंचासमोर कारण सांगितले नाही. तक्रार मंजूर करण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

# आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीच्या राधानगरी उप विभाग यांनी तक्रारदारास सुधारित अंदाजपत्रकाच्या मंजुरीनुसार त्यांनी मागितल्याप्रमाणे कनेक्शन टेंडर प्रक्रिया पूर्ण होताच त्वरित प्राधान्याने मंचासमोर कबून केल्याप्रमाणे ३ महिन्यांत देण्यात यावे. त्याची पूर्तता झाल्याचा अहवाल या कार्यालयास द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :